दैनिक
# महा मेट्रो


एका कारागृहातील अनेक गोष्टी भाग २
पान २



वर्षे : ४ थे, अंक : १२, पुणे, सोमवार दि. २९ डिसेंबर, २०२५ | पाने : ४ किंमत : ३.००
VOL NO.4, ISSUE : 12 Pune, Monday 29 December 2025 | RNI N0.MAHMAR2022/87390 | Pages : 4 PRICE : 3.00

# येरवडा पोलीस ठाण्याचा भार झाला कमी
## लक्ष्मीनगर व विश्रांतवाडी पोलीस ठाण्याचा भार वाढला

पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

पुणे शहराचे झपाट्याने वाढते नागरीकरण, लोकसंख्येतील वाढ तसेच कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम राखण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोहगाव, लक्ष्मीनगर (येरवडा), येवलेवाडी, नऱ्हे आणि मांजरी अशा पाच नवीन पोलीस ठाण्यांच्या निर्मितीस नुकतीच मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे पोलीस प्रशासनावरचा ताण कमी होऊन नागरिकांना तत्काळ मदत मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

या निर्णयानंतर लोहगाव आणि लक्ष्मीनगर या दोन पोलीस ठाण्यांच्या हद्दी निश्चित करण्याबाबतचे प्रस्ताव संबंधित पोलीस ठाण्यांकडून सादर करण्यात आले आहेत. विशेषतः येरवडा, विमानतळ आणि विश्रांतवाडी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत मोठे बदल होणार असून याचा थेट परिणाम गुन्हे नियंत्रणावर होणार आहे.

**लोहगाव पोलीस ठाण्याची विस्तृत हद्द :** नव्याने स्थापन होणाऱ्या लोहगाव पोलीस ठाण्यात वडगांव शिंदे, पोरवाल रस्ता, अजिंक्य डी. वाय. पाटील रस्ता, हरणतळे, संतनगर, गावठाण, पवार वस्ती, डायमंड वॉटर पार्क, निरगुडी रस्ता, जनार्दन नगर आणि खांदवे नगर या परिसरांचा समावेश असणार आहे.

लोहगाव पोलीस ठाण्याअंतर्गत पोरवाल रोड, संतनगर आणि हरणतळे येथे तीन नवीन पोलीस चौक्या निर्माण केल्या जाणार आहेत. त्यामुळे लोहगाव व आसपासच्या भागातील नागरिकांना पोलीस सेवा अधिक वेगाने उपलब्ध होणार आहे.

**येरवड्यातून लक्ष्मीनगर स्वतंत्र पोलीस ठाणे :** येरवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोठा भाग विभाजित करून लक्ष्मीनगर हे स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण केले जात आहे. या नव्या पोलीस ठाण्यात गोल्फ चौक, गुंजन चौक, सादल बाबा चौक, संगम वाडी गाव आणि डेक्कन कॉलेज परिसराचा समावेश असणार आहे. पर्णकुटी आणि लक्ष्मीनगरचौकीअंतर्गतयेणारासंपूर्णपरिसर लक्ष्मीनगर पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत जाणार आहे. लक्ष्मीनगर पोलीस ठाण्यांतर्गत पर्णकुटी, संगमवाडी आणि लक्ष्मीनगर अशा तीन चौक्या असणार आहेत. मात्र, सध्या अस्तित्वात असलेली लक्ष्मीनगर चौकी अपुरी ठरत असल्याने नवीन पोलीस ठाण्यासाठी प्रशस्त जागेचा शोध प्रशासनाला घ्यावा लागणार आहे.

**येरवड्याचा भार मोठ्या प्रमाणात कमी होणार :** पुणे शहरातील सर्वाधिक मोठ्या आणि गुन्हेप्रवण हद्दींपैकी एक असलेल्या येरवडा पोलीस ठाण्याचा भार मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. लक्ष्मीनगर आणि विश्रांतवाडी पोलीस ठाण्यांच्या निर्मितीमुळे येरवड्याची निम्म्याहून अधिक हद्द विभाजित होणार आहे. भविष्यात येरवडा पोलीस ठाण्यात केवळ जेल रस्ता आणि रामवाडी या दोनच चौक्या कार्यरत राहतील. यापूर्वी येरवड्यातून विमानतळ आणि चंदननगर पोलीस ठाण्यांची निर्मिती झाली आहे.

**विश्रांतवाडी पोलीस ठाण्याची हद्द आणि जबाबदारी वाढणार :** लक्ष्मीनगर पोलीस ठाणे स्वतंत्र झाल्यानंतर येरवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालय, मनोरुग्णालय वसाहत, आंबेडकर वसाहत, राम सोसायटी, फुलेनगर, सीबीआय कार्यालय, आरटीओ, श्रमिक वसाहत, जाधव नगर, मोहनवाडी, पंचशील नगर, उत्तम टाऊनस्केप आदी परिसर विश्रांतवाडी पोलीस ठाण्याला जोडले जाणार आहेत. त्यामुळे विश्रांतवाडी पोलीस ठाण्याचा कार्यभार लक्षणीयरीत्या वाढणार आहे.

**विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतही बदल :** विमानतळ पोलीस ठाण्यातून लोहगाव परिसर वेगळा होणार असून, येरवड्याच्या हद्दीतील पंचतारांकित हयात, नोवोटेल हॉटेल, नेक्सा शोरूम आणि साकोरे नगरचा परिसर विमानतळ पोलीस ठाण्याला जोडला जाणार आहे.

एकूणच, या नव्या पोलीस ठाण्यांच्या निर्मितीमुळे पुणे शहरातील पोलीस व्यवस्था अधिक सक्षम होऊन गुन्हे नियंत्रण, तात्काळ प्रतिसाद आणि नागरिकांच्या सुरक्षिततेस चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अर्ज भरताय? घरात शौचालय आहे ना? नमूद करणे गरजेचे; इच्छुक उमेदवारांच्या पोटात गोळा

मुंबई-प्रतिनिधी
महा मेट्रो

निवडणूक अर्ज भरताना कागदपत्रांची जुळवाजुळव करताना दमछाक झालेल्या इच्छुक उमेदवारांच्या पोटात आणखी एका नियमामुळे गोळा आला आहे. इच्छुकांच्या शौचालयापर्यंत निवडणुकीची आचारसंहिता येऊन पोहोचली असून, स्वत:च्या मालकीचे घर आहे का, त्यात शौचालय आहे का, भाड्याच्या घरात राहत असाल तर तिथे शौचालय आहे का, घरात शौचालय नसले तर सार्वजनिक शौचालयाचा वापर करत असल्याचे अर्जासोबतच्या प्रमाणपत्रात नमूद करावे लागणार आहे.

नामनिर्देशनपत्रासोबत शौचालय वापर प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. छाननीवेळी प्रमाणपत्र वा स्वयंप्रमाणपत्र सादर न केल्यास नामनिर्देशनपत्र अवैध ठरविण्याचा अधिकार निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना असल्याचे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत काही वर्षांपूर्वी केंद्र सरकारने शहरे-महानगरे हागणदारी मुक्त करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना एक विशेष अट घातली आहे. त्यानुसार अपात्रतेबाबतच्या कलमामध्ये शौचालयाचा नियमितपणे वापर करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. त्यात कसूर करणारी व्यक्ती निवडून येण्यास व सदस्य होण्यास अपात्र ठरेल, अशी तरतूद समाविष्ट करण्यात आली.

२२ डिसेंबर रोजीच्या राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमवेत महानगरपालिका मुख्यालयात झालेल्या बैठकीत याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली होती. सहायक आयुक्त/प्रभाग अधिकारी यांनी उमेदवारांना शौचालय वापर प्रमाणपत्र नियमाधीन कार्यवाही करावी. तथापि, शौचालयाची - व्यक्तीची छायाचित्रे काढण्याची आवश्यकता नसून याबाबत सर्व संबंधितांनी नोंद घेण्याबाबत, महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# राज्यातील पहिले पुणे शहर रेबिज मुक्त होणार !
## महापालिका आरोग्य विभागात कृतीदलाची स्थापना ; कुत्र्यांची नसबंदी व शस्त्रक्रियेवर भर

पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

सरकारच्या धोरणानुसार राज्यातील पुणे शहर हे २०३० पर्यंत रेबिज मुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. रेबिज निर्मूलनासाठी शहरातील नागरिकांच्या व प्राण्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जाणार आहे. यासह नागरिकांमध्ये रेबिज विषाणूच्या विरोधात लढण्यासाठी सत्तर टक्के प्रतिकारशक्ती (हार्ड इम्युनिटी) तयार करण्याचा प्रयत्न असणार असल्याची माहिती पुणे महापालिकेचे मुख्य पशू वैद्यकीय अधिकारी डॉ. सारिका फुंडे यांनी 'सीविक मिरर'ला दिली.

रेबीज आजारावर उपचार नाहीत. प्रतिबंधात्मक उपायोजना हाच एकमेव मार्ग आहे. कुत्रा चावल्यामुळे रेबीज हा आजार जीवघेणा असून वेळीच योग्य उपचार मिळाले तरच जीव वाचवता येऊ शकते. कुत्रा चावल्यानंतर वैद्यकीय उपचारांबाबत खूप कमी प्रमाणात जनजागृती आहे. त्यामुळे रेबीजमुळे गेल्या वर्षी पुणे शहरात सहा तर शहराबाहेरील तब्बल ५२ जणांना मृत्यू झाला आहे. केंद्र सरकारच्या रेबिज निर्मूलन अभियानात राज्यातील पुणे शहर व मुंबई ही दोन शहरे २०३० पर्यंत रेबिज मुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यासाठी पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने कृतीदलाची (टास्कफोर्स) स्थापना केली आहे.

पुणे शहरात भटक्या व मोकाट कुत्र्यांवर नसबंदी शस्त्रक्रिया व लसीकरण विविध संस्थांच्या माध्यमातून होते. ब्लूक्रॉस सोसायटी, ॲनिमल वेल्फेअर असोसिएशन, युनिवर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी अशा संस्थांच्या माध्यमातून दरवर्षी पुणे शहरातील भटक्या कुत्रांना अँटीरेबीजी लस दिली जाते. गेल्या साडे सहा वर्षांत या संस्थांनी ५७ हजार ४७४ कुत्र्यांवर नसबंदी शस्त्रक्रिया व अँटीरेबीजची लस दिली गेली आहे. पुणे शहर २०३० पर्यंत रेबिज मुक्त होणार असल्याचा दावा पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने केली आहे. त्यासाठी पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने कंबर कसली आहे.

### रेबीज एक विषाणूजन्य आजार

प्राण्यांनी चावल्यामुळे विशेषत: कुत्रा चावल्यामुळे पसरणारा रेबजी हा एक विषाणूजन्य ( व्हायरस) आजार आहे. रेबीजचा विषाणू शरीरात शिरल्यानंतर मज्जासंस्थेवर ( सेंट्रल नर्व्हस सिस्टम) हल्ला करतो. यामुळे डोक्यात आणि मणक्यात सूज येते. जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीनुसार रेबीज व्हायरस रुग्णांच्या डोक्यात शिरला तर रुग्ण कोमात किंवा मृत्यू होऊ शकतो. काही रुग्णांमध्ये पॅरालिसिसची ( लकवा) समस्या निर्माण होऊ शकते.

"केंद्र सरकारचा रेबिज मुक्त भारत अभियान सुरू झाले आहे. याअंतर्गत पहिल्या टप्प्यातील राज्यातील पुणे व मुंबई ही दोन शहर घेतली आहेत. २०३० पर्यंत राज्यातील पुणे शहर हे पहिले रेबिज मुक्त शहर करण्याचे उद्दिष्ट आहे. आरोग्य विभागाने कृतीदल स्थापन केले आहे. केंद्र सरकारकडून अँटीरेबीज लस खरेदी करण्यासाठी दीड कोटी रूपयांची मागणी केली आहे. ."

- डॉ. सारिका फुंडे,
मुख्य पशू वैद्यकीय अधिकारी,
पुणे महापालिका

# बारामतीत अदानी दाम्पत्याच्या स्वागतासाठी पवार कुटुंबीय एकाच व्यासपीठावर




बारामती
महा मेट्रो

राज्यात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याच्या चर्चेला गेल्या काही दिवसात विशेष जोर मिळाला आहे. या पार्श्वभूमीवर, विद्या प्रतिष्ठानमध्ये उभारलेल्या देशातील पहिल्या जागतिक 'एआय' सेंटरचे उद्घाटन करण्यासाठी उद्योजक गौतम अदानी हे त्यांच्या पत्नी डॉ. प्रीती अदानी यांसह उपस्थित होते. यावेळी सर्व पवार कुटुंब अनेक दिवसांनी एकाच व्यासपीठावर बारामतीत एकत्र आलेले दिसले.

बारामतीत रविवारी (दि. २८) आयोजित उद्घाटन कार्यक्रमासाठी अदानी दाम्पत्य खास विमानाने बारामती विमानतळावर दाखल झाले. विमानतळावर आमदार रोहित पवार यांनी अदानी दाम्पत्याचे स्वागत केले. तसेच, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'गौतमभाई वेलकम टू बारामती' असे म्हणत त्यांचे स्वागत केले. यावेळी अदानी दाम्पत्य कारमध्ये मागील सीटवर बसले, आमदार रोहित पवार स्वतः सारथी बनून कार चालविण्यास पुढे आले. उपमुख्यमंत्री अजित पवार हे आमदार रोहित पवार यांच्या शेजारील सीटवर पुढे बसले. त्यानंतर, दोन्ही ज्युनिअर काका - पुतण्यांसह अदानी दाम्पत्य विद्या प्रतिष्ठानच्या शरदचंद्र पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजेंस सेंटरमध्ये दाखल झाले. या ठिकाणी पोहचल्यानंतर गौतम अदानी शरद पवार यांच्यासमोर नतमस्तक झाले. अदानी यांच्या हस्ते उद्घाटन झाल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुनेत्रा पवार यांसह त्यांनी सेंटरची पाहणी करून माहिती घेतली.


यानंतर अदानी आणि त्यांची पत्नी विद्या प्रतिष्ठानच्या गदिमा सभागृहात दाखल झाले. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या निमित्त ज्येष्ठ नेते शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार, कृषी विकास प्रतिष्ठानचे चेअरमन राजेंद्र पवार, आमदार रोहित पवार व युगेंद्र पवार एकत्र उपस्थित होते. अदानींच्या पत्नी डॉ. प्रीती अदानी यांचे स्वागत करण्यासाठी सूत्रसंचालकांनी खासदार सुप्रिया सुळेंचे नाव पुकारले. मात्र, खासदार सुळे यांनी स्वतः मागे हटून खासदार सुनेत्रा पवार यांना पुढे येऊ देत त्यांच्याकडून सत्कार करण्याचा मान दिला. यावेळी अनेक दिवसांनी एकत्र आलेले पवार कुटुंब बारामतीकरांच्या कौतुकाचा विषय ठरले. तसेच उद्योजक अदानी यांचे भाषण सुरू असताना ते शरद पवार यांच्या शेजारील खुर्चीवर जाऊन बसले. काही वेळेच्या चर्चेनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार पुन्हा त्यांच्या खुर्चीवर बसले. अदानी दाम्पत्याच्या स्वागतासाठी संपूर्ण पवार कुटुंबीय उपस्थित होते. बारामती येथील एआय सेंटरच्या उद्घाटनानंतर उद्योगपती गौतम अदानी आणि त्यांची पत्नी डॉ. प्रीती अदानी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या गोविंदबाग निवासस्थानी पोहोचले. गोविंदबागेत अदानी दाम्पत्यासाठी स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवारदेखील गोविंदबागेत उपस्थित होते.

# व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून एक लाख ८८४६ बंदी कोर्टात हजर
## राज्यातील ३७ कारागृहात व्हिडिओ कॉन्फरन्स उपलब्ध असल्यामुळे वेळेची व मनुष्यबळाची बचत

पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

राज्यातील साठ कारागृहातील क्षमतेपेक्षा अधिक बंदी क्षमता, त्यामध्ये अपुरे मनुष्यबळ असल्यामुळे न्यायाधिन बंद्यांना (अंडर ट्रायल) कोर्टात हजर करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते. कोर्टात घेऊन जाण्यासाठी बंद्यांना बराकीतून बाहेर काढणे सर्व सोपस्कार करून कोर्टपेशी करीता पोलीसांच्या ताब्यात देणे, त्यानंतर बंद्यांना वाहनातून कोर्टात घेऊन जाणे , त्यांना कोर्टात हजर करणे, न्यायालयीन प्रक्रीया संपल्यानंतर परत त्यांना कारागृहात सुरक्षीतपणे घेऊन येणे मोठे जिकीरिचे काम असते. २०२२-२०२३ मध्ये राज्यातील तब्बल एक लाख ८८४६ बंद्यांना व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून कोर्ट पेशी केल्यामुळे वेळेची व मनुष्यबळाची बचत झाली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने राज्यातील कारागृहातील बंदीपेशी व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून होत आहे. त्यामुळे या व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातूनन गंभीर गुन्ह्यातील खटले तर चालततातच यासह तीन वर्षांच्या आतील शिक्षा झालेल्या कैद्यांना तात्पुरत्या जामिनीवरील निर्णय होतात. राज्यातील ६० कारागृहात चाळीस हजार कैदी असल्यामुळे कारागृहील कैद्यांचे 'ओव्हर फ्लो' काही कमी झाल्याचे दिसून येत नाही. मुंबई , ठाणे, नवी मुंबई, नाशिक, येरवडा, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर अशी मध्यवर्ती कारागृह आहेत. तर येरवडा, विसापूर, धुळे, सिंधुदूर्ग, मोर्शी ही खुली कारागृह आहेत.



यासह कोल्हापूर, सोलापूर, लातूर, रत्नागिरी अशी जिल्हा कारागृहे आहेत. सुरक्षिततेच्या कारणामुळे कैद्यांना मध्यवर्ती कारागृहात ठेवले जाते. त्यामुळे मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांची संख्या जास्त. या कारागृहात दुप्पटीपेक्षा अधिक कैदी संख्या आहे. मुंबई मध्यवर्ती कारागृहात कैद्यांची संख्या ३३० टक्के, सोलापूर जिल्हा कारागृहात ३०६ टक्के आहे. कैदी क्षमतेच्या २०१ ते ३०० टक्के कैद्यांची गर्दी असणारी सहा कारागृहे आहेत.

तर १०१ ते २०० टक्के कैद्यांची गर्दी असलेली १७ कारागृहे आहेत. त्यामुळे दररोज शेकडो कैद्यांना कोर्टपेशी करीता घेऊन जाणे अवघड असते. त्यामुळे अशा कैद्यांना व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून कोर्टात हजर करणे सोपे होते. यामुळे वेळेची, मनुष्यबळासह इंधनाची सुद्धा बचत होते.

चौकट बंद्यांची सुरक्षेसह त्यांना पळून जाता येत नाही कोर्टपेशी दरम्यान अनेक कैदी पूर्वी पोलीसांच्या हातावर तुरी देऊन पळून गेले आहेत. त्यामुळे पोलीसांवर निलंबनाची कारवाई सुद्धा झाल्या आहेत. तर कधी बंद्यांवर कोर्टात हल्ले झाले आहेत. त्यामुळे व्हिडिओ कॉन्फरन्समुळे बंद्यांची सुरक्षेसह त्यांना पळून जाता येत नाही.

| कारागृहे | बंदीक्षमता | बंदीसंख्या |
|---|---|---|
| येरवडा | २४४९ | ६५०० |
| मुंबई | ८०४ | २६९८ |
| ठाणे | ११०५ | ३३४५ |
| कल्याण | ५४० | १७३९ |
| सोलापूर | १२७ | ३८२ |

- मध्यवर्ती कारागृहे - ९
- जिल्हा कारागृहे- २८
- खुले कारागृहे - १९ विशेष
- किशोर सुधारालय - १
- महिला कारागृह - १
- खुली वसाहत - १

# सावधान! पुण्यात 'या' परिसरात फिरताय तर..., एकदा हे जाणूनच घ्या

पुणे -प्रतिनिधी
महा मेट्रो

आल्हाददायक हवामान आणि निसर्गरम्य परिसर असल्याने एकेकाळी निवृत्तीनंतर ज्येष्ठ नागरिकांची वास्तव्यासाठी पुणे शहरालाच पसंती असे. मात्र 'विद्येचे माहेरघर' असलेल्या या शहरातील हवेची गुणवत्ता सध्या घसरली आहे. स्वारगेट ते मंडई परिसरात वाहतूक, रहदारी, दाट लोकवस्ती, बांधकामे आणि कचरा जाळणे या कारणांमुळे हवा प्रदूषणात वाढ झाल्याचे 'परिसर' संस्थेने केलेल्या तपासणीत निदर्शनास आले आहे.

परिसर या खासगी संस्थेकडून हवेची गुणवत्ता मोजण्यासाठी 'एअर क्वालिटी वॉक' हा प्रकल्प राबविण्यात आला. त्यासाठी स्वारगेट मेट्रो ते मंडई मेट्रो स्थानक या १.५ किलोमीटर अंतरावर सायंकाळच्या सुमारास गुणवत्ता तपासणी करण्यात आली. यामध्ये प्रत्येक अंतरावर सूक्ष्म कणांची कमी-जास्त होणारी मापकता आणि त्याची कारणे; तसेच त्याचा दैनंदिन जीवनावर पडणारा प्रभाव, याचा अभ्यास करून अहवाल तयार करण्यात आला, अशी माहिती 'परिसर' संस्थेच्या वरिष्ठ समन्वयक श्वेता वेरणेकर यांनी दिली.

वेरणेकर म्हणाल्या, 'जागतिक आरोग्य संघटनेच्या निर्देशानुसार मानवी आरोग्याला पूरक हवेमधील धुलीकणांचे प्रमाण १०० पेक्षा जास्त नसावे. तसेच सूक्ष्म आणि अतिसूक्ष्म धुलीकणांचे प्रमाण जास्त असल्यास आरोग्यावर परिणाम होतो. स्थानिक नागरिकांच्या मदतीने येथील हवेची गुणवत्ता तपासणीचा प्रकल्प राबविण्यात आला.

सुमारे दीड किलोमीटर पायी केलेल्या तपासणीमध्ये अनेक ठिकाणी २०० पेक्षा जास्त, तर रहदारी किंवा दाट लोकवस्ती आणि वाहतूक नियंत्रण दिवे (सिग्नल) यावर होणारी वाहनांची गर्दी यामुळे ३७२ पेक्षा जास्त धुलीकण असल्याचे निदर्शनास आले.' या भागांतील हवेमध्ये अतिसूक्ष्म कण (पीएम २.५) ३७२ पेक्षा जास्त असल्याने ही बाब नागरिकांच्या आरोग्याच्यादृष्टीने धोकादायक असल्याचा या संस्थेने तयार केलेल्या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

'यापूर्वी पाषाण आणि इतर परिसरात हवेची गुणवत्ता तपासण्यात आली. स्वारगेट ते मंडई परिसरातील हवेची गुणवत्तेत अतिसूक्ष्म धुलीकण सर्वाधिक असल्याचे समोर आले आहे. येत्या काही दिवसांत पुणे स्थानक, येरवडा, स्वारगेट, कात्रज यांसारख्या परिसरातही तपासणी करण्यात येणार आहे. महापालिकेला याबाबतचा अहवाल देण्यात येणार आहे,' असेही वेरणेकर यांनी स्पष्ट केले.

संपादकीय....

# राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या प्रकल्पात पुणे शहर

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (एनडीएमए) या प्रकल्पा अंतर्गत देशातील सात शहरांचा समावेश आहे. यामध्ये मुंबई, चेन्नई, कोलकत्ता, अहमदाबाद, बंगलूरु, हैद्राबाद आणि पुणे या शहरांचा समावेश आहे. अर्बन फ्लड रिस्क मॅनेजमेंट (युएफआरएम) प्रकल्पा अंतर्गत पुणे शहराकरीता पंधराव्या वित्त आयोगांर्तगत (सन २०२१-२०२२ ते २०२५-२०२६) पर्यंत प्रत्येक वर्षा करिता ५० कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. या प्रकल्पा अंतर्गत अल्प व दिर्घ मुदतीचे स्ट्रक्चरल व नॉन स्ट्रक्चरल उपायोजना करण्याच्या सुचना करण्यात आल्या होत्या. मात्र, नुकतच्या झालेल्या पावसानंतर पुणे शहरातील पुर स्थितीत महापालिकेचा आपत्ती व्यवस्थापनाच्या भोंगळ कारभार समोर आला. त्यामुळे भविष्यात मोठ्या पावसामुळे पुरस्थिती उद्भवल्यास मालमत्तेच्या नुकसानासोबतच जीवितहानी होण्याची दाट शक्यता आहे.

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (एनडीएमए) या प्रकल्पांर्तगत पुणे शहराचा समावेश आहे. अर्बन फ्लड रिस्क मॅनेजमेंट ( युएमआरएम) प्रकल्पा अंतर्गत पुणे शहरा करिता पंधराव्या वित्त आयोगांतर्गत २०२०-२०२१ पासून प्रत्येक वर्षाला पन्नास कोटी रूपयांचा निधी मिळत आहे. या निधी मधून महापालिकेने अल्प व दिर्घ मुदतीचे स्ट्रक्चरल व नॉन स्ट्रक्चरल उपायोजना करणे अपेक्षित होते. 'युएमआएम' अंतर्गत मिळालेल्या २८६ कोटी ७० लाख रूपयांच्या आराखड्यास राष्ट्रीय उप समिती व कार्यकारी समितीने मान्यता देखील दिली होती.

पुणे महापालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये आपत्ती व्यवस्थापन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. या केंद्रात सेवकांची चौवीस तास नेमणूक करण्यात आलेली आहे. आपत्ती व्यवस्थापन विभाग मार्फत पुणे महापालिकेतील विविध विभाग, खात्यातील सेवक, कर्मचारी यांचे करिता जनजागृती, प्रशिक्षण, क्षमता व बांधणी आराखडा तयार करण्याचे नियोजन होते. मात्र, पावसाळ्याच्या सुरवातीलाच हे कर्मचारी काही अपवाद वगळता प्रत्यक्षात फिल्डवर दिसलेच नाही.

# एका कारागृहातील अनेक गोष्टी

भाग २

## येरवडा मध्यवर्ती कारागृहाच्या उत्तुंग भिंतीच्या आतील विश्वाचा वेध

भारतीय माणसांची जेवणाची वेळ ही सकाळी दहा वाजता असली तरी रात्रीच्या जेवणाची वेळ ही सायंकाळी चार नसते. मात्र, ब्रिटीशांनी त्याकाळी पुरेशा वीजेची सोय नसल्यामुळे कदाचित सकाळी दहा व सायंकाळी चारची जेवणाची सोय केली असण्याची शक्यता आहे. देश स्वातंत्र झाल्यानंतरही ७५ वर्षांनी राज्यातील कारागृहातील कैद्यांच्या जेवणाची वेळ ही सकाळी दहा व सायंकाळी चार ची आहे. त्यामुळे अनेक कैदी जेवण वाटपाच्यावेळी घेतात आणि त्यांच्या सोईने अर्थात भुक लागल्यानंतर खातात. कारागृहातील जेवण आधीच निकृष्ट दर्जाचे त्या मध्ये उशीरा जेवण केल्यामुळे ते थंड असते. कारागृहात त्यामुळे हंडी पद्धत आली आहे. ताटाचे भांडे करून त्यात जेवण गरज केले जाते. त्यामध्ये गरजे प्रमाणे मीठ, तिखट, तेल आणि फरसाण टाकून ते चविष्ट केले जाते.

**कारागृहात मिळते अवेळी जेवण** - कारागृहाची संकल्पना आज ही ब्रिटीशांनी घालून दिलेल्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे सुरू आहे. कारागृहातील सकाळ पहाटे पाच वाजता सुरू होते. कैदी संख्या मोठी असल्यामुळे सकाळी आवरण्याची घाई सर्वांना असते. अतिशय अस्वच्छ शौचायल, अंघोळीसाठी हौद असतो. हौदातून बादलीत पाणी भरून चक्क अंगावर ओतून घ्यावे लागते. सकाळी मिळणाऱ्या चहा म्हणजे गरम पाण्यासारखा असतो. तर दुपारचे जेवण सकाळी दहा वाजता मिळते. जे पहाटे तीन ते पाचच्या दरम्यान बनविलेले असते. तर संध्याकाळी चार वाजता मिळते ते दुपारी बारा ते दोनच्या दरम्यान बनविलेले असते. हे जेवण अवेळी असल्यामुळे अनेक कैदी सकाळी दहा वाजता मिळालेले जेवण दुपारी एक ते दीड च्या दरम्यान खातात. तर संध्याकाळी मिळालेले जेवण ते साडेसात ते आठच्या दरम्यान खातात.

**जेवण गरम करण्यासाठी हंडी पद्धत** - कैद्यांना मिळणारे जेवण हे अतिशय निकृष्ट दर्जाचे असते हे सर्वश्रुत आहे. त्यामुळे अनेक कैद्यांकडे तिकट, मीठ, तेल, फरसाण आदी वस्तूंचा साठा असतो. जेवणाचे ताटाला ते भांड्याचा आकार देतात. त्याला हंडी म्हणतात. कैदी वाटी घेऊन त्यात वृत्तपत्राची रद्दी व प्लॅस्टिकचा वापर करून आग पेटवतात. या वाटीवर हंडी ठेवतात. या हंडीत कारागृहात मिळालेली भाजी




गरम करतात. त्यात गरजे प्रमाणे तिकट, मिठ, तेल व फरसाण घालून गरम करतात. शक्य असल्यास कागदाप्रमाणे व अर्धी कच्ची मिळालेल्या चपात्या गरम करून खातात. ज्याच्याकडे पैसा आहे त्याच कैद्यांना हंडी पद्धतीने खाता येते. इतर असंख्य कैद्यांना कारागृहातील निकृष्ट जेवण खावे लागतेकारागृहातील 'भांडार' अर्थात सुपर मार्ट

येरवडा मध्यवर्ती कारागृहातील भांडार अर्थात सुपर मार्ट आहे. या भांडारात कैद्यांना पाहिजे ती वस्तू सहज मिळते. अर्थात कैद्यांना अव्वाच्या सव्वा रकम मोजावी लागते. या ठिकाणी कैद्यांना दैनंदिन गरजेच्या वस्तू अर्थात अंघोळीसाठी किंवा कपडे धुण्यासाठी साबण, टुथ पेस्ट, खोबऱ्याचे तेल किंवा बेकरी उत्पादने, उखडलेली अंडी, दुध, तंबाखु, सिगारेट पर्यंत सर्व वस्तू मिळतात. त्या पाहिजे असल्यास चढ्या दराने विकत घ्यावे लागतात. येथील सर्व नोंदी लेखी असल्यामुळे भ्रष्टाचाराचा कळस असतो. ही यंत्रणा खालच्या अधिकारापासून ते मंत्रालयातील सचिव स्तरापर्यंत पोखरलेली आहे. दैनंदिन कैद्यांना मिळणाऱ्या चहा पासून ते जेवणा पर्यंतच्या वस्तूंमध्ये 'मापात पाप' करून कोट्यावधी रूपयांचा भ्रष्टाचार होत आहे. उदाहरण द्यायचे झाले तर किती धान्य, कडधान्य, किराणा माल, तेल, दूध, तिकटापासून ते मीठा पर्यंत येत किती वापरले जाते याचे काहीच प्रमाण नाही. प्रमाण असले तरी ते काटेकारेपणे तपासले जात नाही. त्यामुळे कैदी कधीच तक्रार करीत नाहीत. एखाद्याने केल्यास त्याला वेगळी शिक्षा कारागृहात भोगावी लागते. त्यामुळे सर्वजण गप्प असतात.

**मनीऑर्डरमध्ये भ्रष्टाचार** - कारागृहातील परिस्थिती भयंकर असल्यामुळे येथे जगायचे तर पैसे हवेत म्हणून अनेक कैदी मनीऑर्डर मागवत असतात. या मनीऑर्डर मध्ये मोठा भ्रष्टाचार आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर एखाद्याला हजार रूपये मनीऑर्डर आली तर त्याच्या पर्यंत चारशे ते पाचशे रूपये पोहचतात. या बाबत तक्रार केली तर पुढच्या वेळी मनीऑर्डर बंद केली जाते. आता कारागृहात नवीन डिजीटल प्रणाली आल्यामुळे रोकड पैशांचा वापर कमी झाला आहे. तरी सुद्धा कैद्यांचे आर्थिक शोषण येथे होत असते.

**कारागृहातील आरोग्य सुविधा** - येरवडा मध्यवर्ती कारागृहात मोठे रुग्णालय आहे. या रुग्णालयात मानसोपचारतज्ज्ञ, वैद्यकीय अधिकारी, परिचर आहेत. त्यामुळे दैनंदिन आजारापासून ते साथीच्या आजारावर कैद्यांवर तत्काळ उपचार केले जातात. येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या शिफारसीवरच ससून सारख्या रुग्णालयात कैद्यांना उपचारासाठी पाठविले जाते. या शिफारसीसाठी सुद्धा मोठी आर्थिक देवाण-घेवाण होत असते. त्यामुळे येथे सुद्धा गरीब आणि श्रीमंताचे उपचार वेगळे आहेत. ज्याच्याकडे पैसा त्यांना तत्काळ व चांगले उपचार तर गरीबांना उपचारासाठी प्रतिक्षा करावी लागते.

# ग्रंथदिंडी आली तरीही...

## (७५ व्या साहित्य संमेलनातील एक आठवण)

पुणे मराठी ग्रंथालय आयोजित मराठी साहित्य महामंडळाचे ७५ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन जानेवारी २००२ मध्ये पुण्यात शिवाजी नगर येथील पोलीस ग्राउंड मध्ये संपन्न झाले.सदर साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरील सजावट करण्याची जबाबदारी कार्याध्यक्ष मुकुंद अनगळ यांनी माझे मित्र चित्रकार (कै.) शिरीष देशमुख यांच्यावर सोपविली होती.एक महिना अविरत मेहनत घेऊन माझ्या मित्राने थर्माकोलची अक्षरे तयार केली होती. व्यासपीठाच्या मागील पडदयावर ही अक्षरे लावायची होती. या कामी मदत करण्याची विनंती माझे मित्र शिरीष यांनी केली, त्या नुसार आम्ही दोघांनी हे काम केले.




उदघाटनाचा समारंभ १८ जानेवारी २००२ रोजी सायंकाळी पाच वाजता होता. आम्ही आधल्या रात्री पासूनच हे काम करीत होतो. अ.भा.मराठी साहित्य महामंडळाचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ही अक्षरे मोठी होती. त्यातच थर्माकोलच्या या अक्षरांना सोनेरी चमकी लावल्यामुळे ती वजनाने जड झाली होती. ही मोठी अक्षरे टाचण्यांच्या सहाय्याने मागील पडदयावर लावण्याचे आमचे काम सुरू होते.पण वजनामुळे अक्षरे पुन्हा पुन्हा खाली पडत होती.उदघाटनाची वेळ जवळ येत होती,तसतसा आम्हाला घाम फुटायला लागला. शिरीष धीर देत होता.नेटानं प्रयत्न कर .आपण यशस्वी होऊच असे सांगत होता. अखिल भारतीय मराठी साहित्य ही अक्षरे लावून झाली होती.इकडे ग्रंथदिंडी चालू झाली होती. संमेलनाचे स्वागताध्यक्ष ज्ञानेश्वर आगाशे,उदघाटक शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, संमेलनाध्यक्ष राजेंद्र बनहट्टी, मावळत्या अध्यक्षा विजया राजाध्यक्ष, कार्याध्यक्ष मुकुंद अनगळ, खजिनदार डी.एस.कुलकर्णी अशा दिग्गज मंडळींच्या उपस्तिथीत ग्रंथदिंडी मंडवाजवळ येत होती.हलगीचे स्वर उच्च झाले होते.इकडे आम्ही संमेलन,पुणे ही अक्षरे लावण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होतो. क्षण कसोटीचा होता.ग्रंथदिंडी मंडवाजवळ आली तेव्हा आमची अक्षरे लावून झाली होती.पडदा उघडला.मान्यवर स्थानापन्न झाले.उदघाटनाचा सोहळा सुरु झाला.

आमच्या आनंदाला पारावर उरला नाही.केलेल्या कष्टाचे चीज झाले.ऐन कसोटीच्या क्षणी धीर सोडू नये हे म झ्या मित्राचे शब्द अजूनही आठवतात.

■ श्री. सुदाम कृष्णाजी विश्वे,
( निवृत्त कलाशिक्षक )
पुणे - ४११०२१.
मोबाईल नंबर - ९८६०५८६१४७.

# सुट्टीसाठी तळमळणाऱ्या मंत्र्यांना 'डिसेंबर' हुडहुडी!

डिसेंबर महिना आला की दिल्लीच्या सत्तावर्तुळातील मंडळींना थंडीमुळे नव्हे तर वेगळ्याच काळजीने हुडहुडी भरते. मोदींच्या काळात केंद्रीय मंत्र्यांसाठी सुट्टी मागणे ही एक अतिशय नाजुक कसरत होऊन बसली आहे. २०१४ पासून नरेंद्र मोदी यांनी स्वतः एकही दिवस सुट्टी घेतलेली नाही. वाढदिवस, सण, उत्सव किंवा व्यक्तिगत महत्त्वाच्या गोष्टी यासुद्धा सरकारी कार्यक्रम आणि राजकीय कारणांनी गुंडाळल्या जातात. यामुळे गेल्या दशकभरात मंत्रिमंडळासाठी 'जास्त वेळ काम करा' हा एक कार्य संहितेचा अलिखित नियम होऊन बसला आहे. २०१७ साली मंत्रिमंडळात खांदेपालट झाल्यानंतर हा विषय आणखी जाणवेल इतपत कठोर झाला. अंतर्गत मूल्यमापनात केवळ मंत्रालयातली कामगिरी न मोजता दिल्लीमध्ये हजर असणे आणि पंतप्रधान कार्यालयाने बोलावल्यावर तात्काळ जाणे हे निकषही महत्त्वाचे झाले. त्यामुळे तर सुट्टी मागणे अधिकच अवघड होऊन बसले. वारंवार अनुपस्थित असलेल्या काही निष्प्रभ मंत्र्यांची सरकारमधून गच्छंती झाली.

हा विषय नेमका डिसेंबरम ध्ये डोके वर काढतो. अनेक मंत्र्यांची मुले परदेशात स्थायिक झालेली आहेत किंवा शिकतात. ही कुटुंबे वर्षाच्या शेवटी भेटीगाठीचे बेत आखतात. पण सुट्टी न मिळाल्याने हे बेत पुढे ढकलावे लागतात किंवा सुट्ट्यांची काटछाट करावी लागते. सरकारी काम असेल तर त्यातच कौटुंबिक भेटीगाठी उरकाव्या लागतात किंवा न बोलता सोडून द्यावे लागते. सुट्टीची परवानगी थेट मागणे तर अशक्यच!... मग मध्यस्थाकडून बहुधा प्रयत्न केले जातात. पण बहुदा नकारच मिळतो.

मंत्रिगण पडलेल्या तोंडाने खासगीत विनोद करतात, 'डिसेंबर हा वर्षातला अत्यंत वाईट महिना होय.'

पंतप्रधान एकही दिवस सुट्टी घेत नसतील तर बाकी नेत्यांनी घेऊ नये ही न बोलता व्यक्त केलेली अपेक्षा होते. अर्थात, याला काही अपवाद आहेत. पंतप्रधान क्वचित मेहरबान होऊ शकतात. एका ज्येष्ठ मंत्र्याला मुलाच्या पदवीदान समारंभाला उपस्थित राहण्यासाठी तीन दिवसांची रजा मंजूर करण्यात आली होती. या डिसेंबरमध्येही सुट्टीचे भाग्य लाभलेले काही मंत्री आहेत. पण अशी उदाहरणे कमीच आणि त्यांची संख्या वाढण्याची शक्यता त्याहून दुरापास्त!

भाजपाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून पंतप्रधानांनी ४५ वर्षीय नितीन नवीन यांची निवड का केली? याविषयी अनेक सिद्धांत मानले जात आहेत. त्यातला एक जरा खरा वाटेल असा एका अंतस्थानेच सांगितला. विश्वासू सहकाऱ्यांच्या बंद दाराआड झालेल्या बैठकीत मोदींनी एक प्रश्न विचारला - '२०१० साली नितीन गडकरी भाजपाचे अध्यक्ष झाले, त्यापूर्वी कोणीतरी त्यांचे नाव ऐकले होते का?'- उपस्थितांनी एकमेकांकडे पाहायला सुरुवात केली. त्यांना बहुधा प्रश्नाचे म हत्त्वच कळले नसावे. त्यामुळे त्यांनी गप्प राहणे पसंत केले. पंतप्रधान म्हणाले, 'पक्षाने पुढच्या पिढीतल्या माणसाला अध्यक्ष करायचे ठरवले आणि नितीन गडकरी यांना त्यासाठी दिल्लीत आणले. त्यावेळी ते म हाराष्ट्र सरकारमध्ये मंत्री होते. ५२ व्या वर्षी पक्षाचे अध्यक्ष होणारे गडकरी हे सर्वात तरुण मानले जात!'

आता पंतप्रधानांनी ज्या नितीन नवीन यांना कार्यकारी अध्यक्ष म्हणून निवडले ते (तेव्हाच्या) गडकरींपेक्षा सात वर्षांनी तरुण आहेत. अडवाणींच्या काळातली निवड नितीन गडकरी ही होती, तर मोदींनी बिहार सरकारमध्ये आणि तेही सार्वजनिक बांधकाम आणि रस्ते उभारणी मंत्रालय पाहणाऱ्या ४५ वर्षीय नवीन यांना अध्यक्ष केले, यात नवल ते काय?

अर्थात, पुढच्या पिढीकडे सूत्रे देण्याच्या या निर्णयामुळे सरकारमधील अनेक ज्येष्ठ मंत्र्यांमध्ये तसेच पक्षातही चलबिचल झाली आहे. २०१४ साली मोदी यांच्याकडे सत्ता आली आणि गडकरींनी सूत्रे घेतली. त्या दोन्ही वेळी ज्येष्ठ नेत्यांचे जे झाले होते ते आता पुन्हा तर होणार नाही, अशी भीती त्यांना ग्रासते आहे. त्यावेळी अनेकांना मार्गदर्शक मंडळात पाठवण्यात आले किंवा थेट घरी रवानगी झाली. काही नशिबवान होते ते राज्यपाल झाले.

नुकत्याच संपलेल्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात एक गमतीशीर किस्सा घडला. गालिबचा दाखला देत केंद्रीय कायदामंत्री अर्जुन मेघवाल यांनी काँग्रेसला एक सल्ला दिला. त्यासाठी त्यांनी वापरलेल्या ओळी होत्या -

'उम्र भर 'ग़ालिब' यही भूल करता रहा, धूल चेहरे पर थी, और आइना साफ़ करता रहा!'

यात गडबड अशी की या ओळी गालिब यांनी लिहिलेल्याच नाहीत... आणि हे पहिल्यांदा घडलेले नाही. २०१९ साली पंतप्रधान मोदी यांनी याच ओळी काँग्रेसला उद्देशून वापरल्या होत्या. त्यावेळी गीतकार आणि कवी जावेद अख्तर यांनी समाजमाध्यमांवर जाहीरपणे दाखवून दिले होते की या पंक्ती गालिब यांच्या नाहीत. अभिजात उर्दू भाषेच्या नजाकतीत त्या शोभतही नाहीत.

# अरवली.. हरवली.. जिरवली!

एखाद्या जैविक घटकाची उपयुक्तता, अस्तित्वाबाबतचा निर्णय हा त्याच्या/तिच्या शारीर उंची वा आकार यावरून घेणे शहाणपणाचे असेल काय? म्हणजे अशोकाचे झाड काही विशिष्ट उंचीचे नाही म्हणून तो 'अशोकच नाही', झुडूप आहे असे म्हणून त्याची कत्तल करावी काय? एखादा अजगर लांबीने कमी असल्यास त्यास अजगर न मानता कृमी मानून त्याचे अस्तित्व संपवावे काय? एखाद्या नदीची लांबी/ रुंदी विशिष्ट नाही म्हणून तीस नाला समजून कोरडे होऊ द्यावे काय? एखाद्या तलावात काही कारणाने पाणी कमी झाल्यास त्यास तलाव न मानता मोकळे मैदान मानून ते सुखाने सुकू द्यावे काय? या आणि अशा काही प्रश्नांची उत्तरे देण्याइतके शहाणपण ज्यांच्या ठायी आहे त्यांस अरवली परिसराचा वाद नक्की काय हे कळेल आणि त्या वादावरील त्यांचे मत स्पष्टपणे तयार होईल.

जमिनीवरील सपाटीपासून १०० मीटर (३२८ फूट) वा अधिक उंची असेल तरच त्या टेकडीस अरवली पर्वताचा भाग मानले जाईल आणि अध्र्या किलोमीटरच्या आत इतक्या किमान उंचीचे किमान दोन वा अधिक उंचवटे असतील तर(च) त्यांस अरवली पर्वतराजीचा घटक समजले जाईल, अशी नवी व्याख्या सर्वोच्च न्यायालयाच्या सौजन्याने मंजूर झाली आणि हा वाद सुरू झाला. याचा अर्थ असा की १०० मीटर उंचीपेक्षा कमी उंचीचा डोंगर/ टेकडी इत्यादी भूभाग हा अरवली पर्वताचा हिस्सा मानला जाणार नाही आणि तो कापण्यास सर्रास परवानगी दिली जाईल. या परिसरात सुखेनैव खाणकामही करता येईल. एखादी टेकडी बिचारी ९९ मीटर उंचीचीच असेल तर आपल्या मायबाप सरकारच्या मते यापुढे ती कापून काढण्याच्या लायकीची असेल. नुकतेच निवृत्त सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या पीठाने २० नोव्हेंबरास केंद्र सरकारची ही उंची व्याख्या मान्य केली आणि 'अरवली वाचवा' मोहीम हाती घेत या पर्वतरांगेने जोडल्या गेलेल्या चार राज्यांतील सुबुद्ध नागरिक रस्त्यावर उतरले. अरवली पर्वतराजी ही उत्तर भारतीय भूगोलातील एक मुख्य नैसर्गिक निर्मिती. आपल्या शेजारील गुजरातपासून राजस्थान, हरयाणा आणि अखेर दिल्लीपर्यंत ही पर्वतरांग पसरलेली आहे. या पर्वतराजीच्या अलीकडे आणि पलीकडे अशा दोन पर्यावरणीय व्यवस्था तयार झाल्या. राजस्थानातील वालुकामय प्रदेश दिल्लीकडे सरकला नाही कारण या पर्वतराजीने त्यास रोखले. एखादा डोंगर, पर्वत, पर्वतराजी ही त्या त्या प्रदेशातील वातावरणाचे कार्यकारण असते. अरवली पर्वतरांग ही त्यापैकी एक.

तिच्या अस्तित्वालाच नख लावण्याचा प्रयत्न हा आताचा नाही. याहीआधी २०१० साली राजस्थान सरकारने या पर्वतराजीत विकासाच्या नावे घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी न्यायालयाने तो हाणून पाडला. त्यासाठी न्यायालयाने 'फॉरेस्ट सव्र्हे ऑफ इंडिया' या मध्यवर्ती यंत्रणेकडून या पर्वतराजी परिसराचा रीतसर अभ्यास करून घेतला. या यंत्रणेने पर्वतराजीचा भूभाग प्रत्यक्ष पाहून आपला निष्कर्ष सादर केला आणि काही ठिकाणी उंच असलेले या रांगेतील डोंगर अनेक ठिकाणी तीन अंशाच्या कोनातही उतरतात हे दाखवून दिले. सबब ही सर्व पर्वतरांग एकसंध मानली जावी असे या संस्थेच्या तज्ज्ञांचे म्हणणे. न्यायालयाने ते ग्राह्य धरले आणि उंची हा निकष न मानता समग्र पर्वतराजीच्या रक्षणाचा आदेश दिला. सर्वोच्च न्यायालयातही त्यावर शिक्कामोर्तब झाले. तथापि न्या. गवई यांच्या पीठाने आधीच्या अन्य काही निकालांप्रम ाणे याबाबत वेगळी भूमिका घेतली आणि केंद्र सरकारची पर्वतरांग ठरवण्याची नवी व्याख्या स्वीकारली. प्रकल्पांची पूर्वलक्ष्यी पर्यावरणीय मंजुरी ग्राह्य ठरवणारा १८ नोव्हेंबर २०२५ रोजीचा निर्णयदेखील न्या. गवई यांचाच, ही बाब या संदर्भात सूचक. अरवली पर्वतराजीबाबतही त्यांनी केंद्राच्या बदलत्या व्याख्येस न्यायालयीन मान्यता दिली आणि देशभरातील पर्यावरणप्रेमींमध्ये एकच संतापाची लाट उसळली. हा संताप अस्थानी नाही.

याचे कारण फक्त अरवलीचा विनाश हा इतकाच मुद्दा नाही. प्रश्न विदर्भाच्या हिरव्यागार जंगलात खाणींना परवानगी देण्याचा असो, नाशिकमधील १८०० वृक्ष कत्तलीचा असो वा आर्थिक राजधानीतील खारफुटी वा अन्य वृक्षांच्या संवर्धनाचा असो. विद्यमान सत्ताधीश सर्व पर्यावरणीय संकेतांस सहज खुंटीवर टांगतात आणि हवे ते प्रकल्प रेटतात, हे अनेकदा सिद्ध झालेले आहे. मुंबईसारख्या शहरात तर सरकारच्या डोळय़ादेखत खाडीलगतची खारफुटी राडारोडा टाकून बिल्डरांकडून सर्रास बुजवली जाते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे शहरातील हिरवाईची दोन-पाच कंत्राटदारांच्या भल्यासाठी सहज कत्तल होते. पुणे ते सातारा महामार्गाकडे एकेकाळी 'वरून' पाहणारे कित्येक डोंगर दिसेनासे होतात. मुंबईचे उपनगर असलेल्या नवी मुंबईतील सर्व टेकडय़ा सपाट होत जातात. तेव्हा पर्यावरणाच्या प्रश्नावर सहजी उद्दामपणा करणाऱ्या भाजप सरकारने अरवलीबाबत घातक निर्णय घेतला नसेल असे मानणे केवळ भक्तगणांसच शक्य व्हावे. तथापि या मुद्दय़ावर नागरिक ज्या त्वेषाने आणि उद्विग्नतेने पेटून उठले ते पाहता केंद्रास एखादे पाऊल का असेना; पण मागे घ्यावे लागले. या चार राज्यांतील नागरिकांनी पक्षीय भेदाभेद दूर सारत अरवली वाचवा अशी मोहीम हाती घेतली आणि आधीच राजस्थानात राजकीय वादळांमुळे संकटात आलेल्या भाजपस त्याची दखल घ्यावी लागली. आता सरकार म्हणते अरवली पर्वतराजीत नव्याने खाण कंत्राटे दिली जाणार नाहीत. ते छान. पण यातील नव्याने हा शब्द महत्त्वाचा. याचे कारण यातील काही जुनीच कंत्राटे पूर्वलक्ष्यी प्रभावाने मंजूर करण्याचे चातुर्य सरकार दाखवणारच नाही, असे नाही.

दैनिक 'महा मेट्रो' प्रकाशक, मालक, संपादक दिलीप कुऱ्हाडे यांनी श्री समर्थ एंटरप्रायजेस, शॉप न. १, बेसमेंट, वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० (महाराष्ट्र) येथे छापून फ्लॅट नं.९, फ्रेंडन्स पॅराडाईज सोसायटी, शिरोळे रोड, संभाजी बागेच्या समोर, शिवाजीनगर, पुणे–४११००४ येथे प्रकाशित केले.
दूरध्वनी क्रमांक २०-४००४६६०९, मोबाईल : ९९२२९३०१९५, Email-mahametronews.pune@gmail.com या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामध्ये व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
RNI NO. MAHMAR2022/87390 MAHA METRO This Daily Owner, Publisher, Editor, is Mr. Dilip Kisan Kurhade Printed at Shree Samarth Printers, Shop No.1, Besment, Vartak Apartment, 499, Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Flat No. 9, Friends Paradies Society, Shirole Road, Opp. Sambhaji Park, Shivaji Nagar, Pune - 411004.

# अजित पवारांचं भाजपसोबत जाणं, हा शरद पवारांचाच प्लॅन! नवनीत राणा असं का म्हणाल्या?

पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो



राजकीय वर्तुळात कायम चर्चेत राहणाऱ्या बारामतीमध्ये आज एका विशेष कार्यक्रमाच्या निमित्ताने संपूर्ण पवार कुटुंब आणि उद्योगपती गौतम अदानी एकत्र पाहायला मिळाले. 'शरद पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजेंस'चे उद्घाटन गौतम अदानी यांच्या हस्ते पार पडले. या कार्यक्रमाला शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. मात्र, या कौटुंबिक आणि राजकीय भेटीवर भाजप नेत्या नवनीत राणा यांनी केलेल्या दाव्याने राज्याच्या राजकारणात नवी खळबळ उडवून दिली आहे.

पवार कुटुंबियांच्या या एकत्र येण्यावर भाष्य करताना नवनीत राणा म्हणाल्या की, अजित पवार भाजपसोबत गेले, ही शरद पवारांचीच इच्छा होती. त्यांच्या सांगण्यावरूनच हे सर्व घडले आहे. राणा यांनी जुन्या संदर्भांचा दाखला देत म्हटले की, पहाटेचा शपथविधी हा शरद पवारांच्याच नियोजनाचा भाग होता. अजित पवारांनी भाजपसोबत जाऊन निवडणूक लढवणे आणि मंत्रिपदाची शपथ घेणे, हे सर्व चित्र शरद पवारांनीच तयार केले. आज बारामतीत पवार कुटुंब एकत्र दिसले, यात नवल वाटण्यासारखे काही नाही, कारण मुळात हे सर्व पवारांच्याच संमतीने सुरू आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नवनीत राणा यांनी केलेल्या या दाव्यामुळे महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये पुन्हा एकदा आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जाण्याची शक्यता आहे. अजित पवारांचे बंड हा शरद पवारांचाच प्लॅन होता का? या प्रश्नावर आता राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांकडून काय प्रतिक्रिया येतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# भाजप उमेदवारांसाठी 'ईव्हीएम'मध्ये दोन ते अडीच हजार मते सेट; राष्ट्रवादी (अजित पवार)चा भाजपवर पलटवार

पिंपरी- प्रतिनिधी
महा मेट्रो

महापालिकेत १२८ जागांपैकी १२५ जागांवर नगरसेवक निवडून येतील, असा दावा भाजपचे निवडणूक प्रमुख, आमदार शंकर जगताप यांनी केल्यानंतर राष्ट्रवादी (अजित पवार)चे शहराध्यक्ष योगेश बहल यांनी पलटवार केला आहे.

राष्ट्रवादीच्या माजी नगरसेवकांना पक्षात घेताना मतदान यंत्रात (ईव्हीएम) दोन ते अडीच हजार मते आपोआप मिळतील, असे भाजपकडून सांगितले जात असल्याचा आरोप त्यांनी शनिवारी (दि. २७) केला. भाजपसोबत राज्यातील सत्तेत असलेल्या राष्ट्रवादीने असा गंभीर आरोप केल्यामुळे शहरात खळबळ उडाली आहे. भाजप आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढत आहेत. या दोन्ही पक्षांमध्ये माजी नगरसेवकांच्या फोडाफोडीवरून आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत.

बहल म्हणाले की, शहरात भाजपचे विधानसभेचे दोन आणि विधानपरिषदेचे दोन असे चार आमदार आहेत. प्रत्येक आमदार २५ नगरसेवक निवडून आणेल असे भाजप नेतृत्वाला वाटत असेल. त्यामुळे शंभरपारचा नारा दिला जात आहे. त्याला आमची हरकत नाही. आता भाजपने १२८ पैकी १२५ नगरसेवक निवडून आणण्याचा नारा दिला आहे. त्यांनी ईव्हीएम सेट केले आहे का, हे त्यांनाच माहीत! मात्र, पक्षात घेणाऱ्या माजी नगरसेवकांना मतदान यंत्रामध्ये दोन ते अडीच हजार मते आपोआप मिळतील, तुम्ही आमच्याकडे या, बाकीची सर्व मदत करतो, असे आश्वासन भाजप नेत्यांकडून दिले जात आहे.

# आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या झगमगाटात नागरिकांचा जीव धोक्यात..! पुरंदरमधील रस्ते सायकलपटूंना 'रेस ट्रॅक'

नीरा -प्रतिनिधी
महा मेट्रो

आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेच्या झगमगाटासाठी पुरंदर तालुक्यातील रस्त्यांना रंगरंगोटी व डांबरीकरण करण्यात आले असले, तरी या रस्त्यांवरून दररोज प्रवास करणाऱ्या सामान्य नागरिकांच्या जीवित सुरक्षेकडे प्रशासनाने पूर्णतः दुर्लक्ष केल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. काळाकुट्ट, गुळगुळीत डांबर आणि पांढरे पट्टे एवढ्यावरच बांधकाम विभाग थांबल्याने 'स्पर्धकांसाठी रस्ते, पण नागरिकांसाठी मृत्यूचा सापळा' अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे.

पुणे जिल्ह्यात होत असलेल्या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेसाठी पुरंदर तालुक्यातील रस्त्यांच्या डागडुजी व सुशोभीकरणावर कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करण्यात येत आहे. मात्र या सर्व खर्चात वाहतूकसुरक्षा हा अत्यंत महत्त्वाचा घटक पूर्णपणे दुर्लक्षित राहिल्याचे स्पष्ट दिसून येते. स्टेज २ मध्ये पुणे–पुरंदर–राजगड–हवेली तर स्टेज ३ मध्ये पुरंदर–बारामती मार्गे सायकली धावणार असून, या स्पर्धेसाठी पुणे जिल्ह्यातील सर्वाधिक अंतर पुरंदर तालुक्यातून जाणार आहे.



पुरंदर तालुक्यातील नीरा शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बुवासाहेब चौक या अत्यंत वर्दळीच्या रस्त्यावर नुकतेच पांढरे पट्टे ओढण्यात आले आहेत. मात्र या रस्त्यावर एकही 'झेब्रा क्रॉसिंग' नसल्याने पादचाऱ्यांसाठी हा रस्ता जीवघेणा ठरत आहे. याच मार्गावरून शाळकरी मुले, वृद्ध नागरिक, महिला तसेच खरेदीसाठी येणारे नागरिक मोठ्या प्रमाणात ये-जा करतात. तरीही त्यांच्या सुरक्षिततेसाठी साधी तजवीज करण्याचे औदार्यही बांधकाम विभागाने दाखवलेले नाही.

हा रस्ता नेमका कुणासाठी? असा सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत. हा रस्ता जणू धनिकांच्या सायकली सुसाट पळवण्यासाठीच तयार केल्यासारखा भासतो, तर सामान्य नागरिक, गोरगरीब व पादचारी यांच्यासाठी कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसल्याचे चित्र आहे.

तालुक्यातील दोन महत्त्वाचे घाट तसेच ग्रामीण भागातील अनेक रस्त्यांवर केवळ वरवरची, तकलादू मलमपट्टी करण्यात आल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. सध्या रस्ते गुळगुळीत आणि काळेभोर दिसत असले, तरी ऐन उन्हाळ्यात हे डांबर उखडून रस्त्यांची दुरवस्था होण्याची दाट शक्यता जाणकार बांधकाम व्यावसायिक व्यक्त करत आहेत.

धक्कादायक बाब म्हणजे, या रस्त्यांवर तीव्र चढ-उतार, धोकादायक वळणे, पुढे गाव आहे, शाळा आहे, वेगमर्यादा आदी कोणतेही सूचना फलक दिसून येत नाहीत. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्पर्धेच्या नावाखाली किमान आंतरराष्ट्रीय दर्जाची रस्ता सुरक्षा मानके तरी पाळली जाणार नाहीत का, असा सवाल उपस्थित होत आहे.

# राष्ट्रवादीनेच हक्काचा प्रभाग गमावला, अंतर्गत गटबाजीचा फटका; माळेगावात राजकीय चर्चेला उधाण



माळेगाव - प्रतिनिधी
महा मेट्रो

माळेगाव नगरपंचायत निवडणुकीच्या नुकत्याच जाहीर झालेल्या निकालावरून राष्ट्रवादी काँग्रेसचा पराभव विरोधकांपेक्षा स्वतःच्या अंतर्गत गटबाजीमुळेच झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या निवडणुकीत पाच अपक्ष उमेदवारांनी विजय मिळविल्याने शहरातील राजकीय समीकरणे बदलली असून, त्याची जोरदार चर्चा सुरू आहे.

यातील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला तो प्रभाग क्रमांक ९. या प्रभागात निवडणूक अतिशय अटीतटीची झाली. राष्ट्रवादीकडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विश्वासू मानले जाणारे ॲड. राहुल तावरे यांच्या पत्नी ॲड. गायत्री राहुल तावरे यांना उमेदवारी देण्यात आली होती. त्यांच्या विरोधात जयश्री बाळासो तावरे निवडणूक रिंगणात होत्या. अत्यंत चुरशीच्या लढतीत चिठ्ठीद्वारे जयश्री तावरे विजयी ठरल्या.

प्रभाग क्रमांक ९ हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला मानला जातो. माळेगाव शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष दादा जराड हे या प्रभागातील रहिवासी असून, माळेगाव साखर कारखान्याचे निवृत्त कर्मचारी मोठ्या संख्येने येथे वास्तव्यास आहेत. त्यामुळे हा प्रभाग राष्ट्रवादीचा सर्वांत सुरक्षित मानला जात होता. गायत्री तावरे यांना उमेदवारी मिळाल्यानंतर त्यांना माळेगावमधील सर्वाधिक मताधिक्य मिळेल, असा अंदाज व्यक्त होत होता.

मात्र, स्थानिक राजकारणातील अंतर्गत संघर्षाने या अंदाजांना छेद दिला. गायत्री तावरे निवडून आल्यास आपले राजकीय महत्त्व कमी होईल, या भीतीपोटी राष्ट्रवादीतीलच एका युवा नेत्याने आपल्या पदाचा गैरवापर करत त्यांच्या पराभवासाठी सक्रिय प्रयत्न केल्याचा आरोप होत आहे. अजित पवार यांनी दिलेल्या उमेदवारालाच उघड विरोध करण्याचे धाडस या युवा नेत्याने केल्याने माळेगावात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगता सभेत स्पष्ट निर्देश दिले होते की, मी दिलेल्या उमेदवारांच्या पाठीशी सर्वांनी ठाम उभे राहावे. माझ्यानंतर कोणी वेगळा विचार केल्यास त्याच्याकडील पदाचा राजीनामा घेतला जाईल व त्याला पदावरून हटवले जाईल. मात्र या निर्देशांकडे सोयीस्कर दुर्लक्ष करत संबंधित युवा नेत्याने गायत्री तावरे यांच्या पराभवात महत्त्वाची भूमिका बजावल्याची चर्चा आहे. आता पक्षविरोधी भूमिका घेतल्याचा आरोप असलेल्या या युवा नेत्यावर अजित पवार कारवाई करणार की अभय देणार, याकडे संपूर्ण माळेगावचे लक्ष लागले आहे.

# कुरकुंभजवळ पुणे-सोलापूर महामार्गावर बंदुकीचा धाक; महिलांचे दागिने लुटले

कुरकुंभ - प्रतिनिधी
महा मेट्रो

कुरकुंभ येथे पुणे-सोलापूर महामार्गावर शुक्रवारी (दि. २६) मध्यरात्री सुमारे २ वाजण्याच्या सुमारास बंदुकीचा धाक दाखवत महिलांच्या अंगावरील सोन्याचे दागिने लुटून नेल्याची गंभीर घटना घडली आहे. या घटनेमुळे महामार्ग परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, रात्रीच्या प्रवासाबाबत प्रवाशांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.


अक्कलकोट, तुळजापूर आणि येडेश्वरी देवीच्या दर्शनाहून परतत असताना चालकाला झोप आल्याने कार क्रमांक (एमएच १४ एम टी ४६०९) कुरकुंभ येथील पुणे-सोलापूर महामार्गावरील पुलाच्या पुढे रस्त्याच्या कडेला थांबवण्यात आली होती. कार थांबलेली असतानाच दुचाकीवरून आलेल्या तीन अज्ञात व्यक्तींनी बंदुकीचा धाक दाखवत तसेच लोखंडी रॉडने मारहाण करत कारमधील महिलांच्या अंगावरील सोन्याचे दागिने जबरदस्तीने काढून घेतले आणि पसार झाले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांनी तत्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पीडित प्रवाशांनी दिलेल्या वर्णनाच्या आधारे आरोपींच्या शोधासाठी विशेष पोलिस पथके तैनात करण्यात आली असून, महामार्गावरील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

दरम्यान, या घटनेनंतर पुणे-सोलापूर महामार्गावरील रात्रीच्या गस्त व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. पाटस टोलनाक्यावरील गस्त वाहनांची प्रभावी उपस्थिती आहे की नाही, याबाबतही शंका व्यक्त केली जात आहे. तसेच महामार्गालगत असलेल्या अनेक व्यावसायिक आस्थापनांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणांचा अभाव असल्याचे चित्र समोर आले आहे.

महामार्गावर वाढत असलेल्या जबरी चोरी व लुटमारीच्या घटनांमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, अशा गुन्हेगार टोळ्यांना तातडीने जेरबंद करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रशासनाने महामार्गावरील गस्त वाढवून सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# डेक्कन कॉलेज पुरातत्व वस्तूंची रिप्लिका ( प्रतिकृती) तयार करून विक्री करणार

## सिंधू संस्कृति व देशभरातील उत्खननात सापडलेल्या वस्तू घर व कार्यालयांच्या इंटिरियरमध्ये स्थान मिळविणार



येरवडा - प्रतिनिधी
महा मेट्रो

सिंधु संस्कृतीची उदय हडप्पा व मोहेजदडो या शहरातून झाली. हे शहर स्थापत्यशास्त्राचा एक सुंदर नमुना होता. या शहराच्या उत्खननात अनेक प्राचिन वस्तू पुरातत्व विभागाला सापडल्या. यामध्ये मुर्त्या, माणिक व मोतीचे दागिने, भांडी, खेळणी , टेराकोटाच्या मुर्त्यांचा समावेश होता. अशा अनेक वस्तू डेक्कन कॉलेजच्या पुरातत्व संग्रहालयात आहेत. यासह महाराष्ट्रातील व देशभरात विविध ठिकाणी झालेल्या उत्खननात शेकडो वस्तू सापडल्या आहेत. या वस्तूंचे पुरातत्वदृष्ट्या अधिक महत्व आहे. पण या वस्तूंच्या प्रतिकृती ( रिप्लिका) जर तयार केल्या तर त्याला मागणी मोठी असेल व त्यातून उत्पन्न सुद्धा मिळू शकते. त्यामुळे डेक्कन कॉलेज पुरातत्व वस्तूंच्या प्रतिकृती तयार करण्याच्या विचारात आहे.

> “डेक्कन कॉलेज पुरातत्व विभागात गेली अनेक वर्षे महाराष्ट्रासह देशभरातील उत्खननात अनेक वस्तू सापडल्या आहेत. अशा वस्तूंच्या प्रतिकृती ( रिप्लिका) बनविण्याच्या विचारात आहोत. अशा वस्तूंना देश व विदेशात मोठी मागणी आहे. यातून लघुउद्योजकांना मोठी संधी मिळेल व कॉलेजच्या उत्पन्नात भर पडेल.”

**रिप्लिकांची ऑनलाईन विक्रीला मोठा प्रतिसाद**

देशभरात ग्रीक पॉटरी, कॉईन्स, मूर्त्या, ब्रॉझच्या मृत्या, टेराकोटाच्या मुर्त्या, माणिक व मोतीचे दागिने अशा अनेक वस्तूंच्या प्रतिकृतींचा (रिप्लिका) यात समावेश आहे. या वस्तू एक हजारापासून ते लाखो रूपयांपर्यंत त्यांच्या किंमती आहेत.

ग्रामिण असो वा शहर प्रत्येकाला घरात किंवा कार्यालयात शोभेच्या वस्तू ठेवण्यावर भर असतो. त्यात जर का वस्तू ही पुरातत्व काळातील असेल तर अशा वस्तू दर्शनी भागात ठेवण्यावर अनेकांचा भर असतो. आता तर कार्पोरेट युगात हस्तचित्र, पेटिंग, पोर्टरेट आणि रिप्लिंकाना अधिक महत्व दिले जाते. जगभरात या वस्तूंना प्रचंड मागणी आहे. त्यामुळे डेक्कन कॉलेज पुरातत्व विभाग त्यांच्याकडे असलेल्या शेकडो वस्तूंच्या प्रतिकृती ( रिप्लिका) तयार करणार आहेत. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना या वस्तूंच्या निर्मिती बरोबरच रिप्लिकांचे उत्पादन होणार आहे. यासह इतर लघु उद्योजकांना या वस्तूंच्या उत्पादनाची संधी मिळणार आहे.

# बंगळुरू येथील एमडी ड्रग्ज कारखाने उद्ध्वस्त; ५५ कोटी ८८ लाखांचा मुद्देमाल जप्त

पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो



महाराष्ट्र राज्य अमली पदार्थविरोधी टास्क फोर्सने कर्नाटकची राजधानी बंगळुरू येथे मोठी कारवाई करत एमडी (मेफेड्रोन) ड्रग्ज तयार करणारे तीन अवैध कारखाने उद्ध्वस्त केले. या कारवाईत ५५ कोटी ८८ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आतापर्यंत याप्रकरणी, चौघांना अटक केली, तर त्यांचे दोघे साथीदार फरार आहेत. या कारवाईने आंतरराज्यीय अमली पदार्थ तस्करीचे मोठे जाळे उघडकीस आले आहे. महाराष्ट्र शासनाने अमली पदार्थांची विक्री, पुरवठा व वितरण रोखण्यासाठी अमली पदार्थविरोधी टास्क फोर्सची स्थापना केली असून सध्या राज्यात सात विभागीय कृती कार्यालयांमार्फत प्रभावी कारवाया सुरू आहेत.

२१ डिसेंबर रोजी टास्क फोर्सच्या कोकण पथकाने नवी मुंबईतील वाशी गावाजवळील जुन्या बस डेपो परिसरात छापा टाकून आरोपी अब्दुल कादर रशीद शेख याच्याकडून १ किलो ४८८ ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त केले होते. याची बाजारभावानुसार किंमत १ कोटी ४८ लाख ८० हजार रुपये इतकी असून या प्रकरणी वाशी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्याच्या पुढील तपासात तसेच तांत्रिक विश्लेषणातून बेळगाव येथे राहणारा आणि एमडी ड्रग्ज तयार करणारा प्रशांत यल्लापा पाटील याचे नाव निष्पन्न झाले. चौकशीतून बंगळुरू शहरात एमडी ड्रग्ज तयार करणारे तीन कारखाने सुरू असल्याची माहिती समोर आली. त्यानंतर पोलिस पथकाने बंगळुरूमध्ये कारवाई करत राजस्थानचा रहिवासी पण सध्या बंगळुरूमध्ये अमली पदार्थांचा अवैध व्यवसाय करणारे सुरज रमेश यादव आणि मालखान रामलाल बिश्नोई या दोघांना ताब्यात घेतले. आरोपींनी गुन्ह्याची कबुली देत स्पंदना ले-आउट कॉलनी, एनजी गोलाहळी भागातील 'आर जे इव्हेंट' नावाचा कारखाना तसेच येरपनाहळी-कन्नूर भागातील लोकवस्तीत असलेले आरसीसी घर येथे एमडी ड्रग्ज तयार केले जात असल्याची माहिती दिली.

पोलिसांनी या तिन्ही ठिकाणी छापे टाकून, ४ किलो १०० ग्रॅम एमडी ड्रग्ज, द्रव स्वरूपातील १७ किलो एमडी, एमडी तयार करण्याची यंत्रसामग्री व विविध रसायने असा एकूण २१ किलो ४०० ग्रॅम एमडी ड्रग्जसह ५५ कोटी ८८ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या तिन्ही ठिकाणचे कारखाने तत्काळ नष्ट करण्यात आले. प्राथमिक तपासात या कारखान्यांत तयार झालेले एमडी ड्रग्ज देशातील अनेक राज्यांत वितरित केले जात असल्याचे तसेच आरोपींनी बंगळुरू शहरात अमली पदार्थांच्या विक्रीतून मोठ्या प्रमाणात स्थावर मालमत्ता खरेदी केल्याचे निष्पन्न झाले आहे. आतापर्यंत या गुन्ह्यात चार आरोपींना अटक करण्यात आली असून उर्वरित दोन मुख्य आरोपींच्या शोधासाठी पथके कार्यरत आहेत.

ही कारवाई अप्पर पोलिस महासंचालक सुनील रामानंद, विशेष पोलिस महानिरीक्षक शारदा राऊत, उपमहानिरीक्षक प्रवीणकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे कृती गटाचे पोलिस अधीक्षक एम. एम. मकानदार, अपर पोलिस अधीक्षक कृष्णात पिंगळे, कोकण कृती गटाचे पोलिस उपाधीक्षक रामचंद्र मोहिते, पोलिस निरीक्षक संतोष गावशेते, नीलेश बोधे, सहायक पोलिस निरीक्षक उदय काळे, माधवानंद धोत्रे यांच्या पथकाने केली.

# बंडू आंदेकरने अपक्ष म्हणून सादर केलेला अर्ज अर्धवटच; निवडणूक अधिकाऱ्यांनी अर्ज स्वीकारला नाही

पुणे - प्रतिनिधी
महा मेट्रो

हातात बेड्या आणि गळ्यात दोरखंड असलेल्या स्थितीत कुख्यात आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू आंदेकर मोठमोठ्या आवाजात घोषणाबाजी करीत महापालिका निवडणुकीसाठी भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयात अपक्ष उमेदवार अर्ज दाखल करायला गेला खरा; मात्र अर्ज अर्धवट असल्यामुळे तो भरूनच घेतला नाही. सोमवारी आता (दि. २९) पुन्हा आंदेकर अर्ज भरणार असल्याचे कळते.

आयुष कोमकर हत्या प्रकरणात बंडू आंदेकर सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. विशेष न्यायालयाने बंडू आंदेकर, तसेच त्यांच्या कुटुंबातील लक्ष्मी उदयकांत आंदेकर आणि सोनाली वनराज आंदेकर यांना आगामी महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सशर्त परवानगी दिली आहे. मात्र, अर्ज दाखल करताना कोणतीही मिरवणूक, भाषण किंवा घोषणाबाजी करण्यास न्यायालयाने स्पष्ट मनाई केली आहे. तरीही उमेदवारी अर्ज भरायला जाताना बंडू आंदेकर याने 'नेकी का काम, आंदेकर का नाम', 'बघा बघा मला लोकशाहीत कसं आणलंय', 'आंदेकरांना मत म्हणजे विकासकामाला मत', 'मी उमेदवार आहे दरोडेखोर नाही', 'वनराज आंदेकर जिंदाबाद', अशा घोषणा देत कार्यालयात प्रवेश केला. दरम्यान, बंडू आंदेकर, लक्ष्मी उदयकांत आंदेकर, तसेच सोनाली वनराज आंदेकर हे शनिवारी पोलिस बंदोबस्तात उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आले होते. मात्र, त्यांचा उमेदवारी अर्ज हा अर्धवट भरलेला होता. त्यामुळे त्यांचा अर्ज स्वीकारण्यात आला नाही. अर्ज भरण्यासाठी आणखी तीन दिवसांची मुदत असून, या कालावधीत ते पुन्हा अर्ज भरू शकतात, असे भवानी पेठे क्षेत्रीय कार्यालयाचे निवडणूक निर्णय अधिकारी कल्याण पांढरे यांनी सांगितले.

या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर आयुष कोमकरच्या आई संजीवनी कोमकर यांनी माध्यमांशी बोलताना आंदेकर कुटुंबीयांना कोणत्याही राजकीय पक्षाने उमेदवारी देऊ नये, अशी कळकळीची विनंती केली होती. 'जर आम्हाला न्याय देता येत नसेल, तर किमान अन्याय तरी करू नका. माझ्या लहान मुलाचं आयुष्य उद्ध्वस्त करण्यात आले आहे. सत्ता होती म्हणून त्यांनी आजवर सर्व काही केले. कृपया त्यांना निवडणुकीचे तिकीट देऊ नका,' असे त्या म्हणाल्या होत्या. तसेच, जो पक्ष आंदेकरांना तिकीट देईल, त्या पक्षाच्या कार्यालयासमोर जाऊन मी आत्मदहन करेन. मला माझ्या गोविंदाला न्याय हवा आहे. एवढेच मला पाहिजे, अशी भावनिक प्रतिक्रिया संजीवनी कोमकर यांनी व्यक्त केली होती.

# राज्यात माळढोक पक्षी उरले फक्त तीन ते पाच!

## दुर्मिळ पक्ष्याला वाचविण्यासाठी कृत्रिम अंडी उबविण्याचा प्रयोग



पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

देशात अतिशय दुर्मिळ होत असलेल्या माळढोक पक्षी (ग्रेट इंडियन बस्टार्ड) अवघे तीन ते पाच उरले आहेत. या माळढोक पक्ष्यांसाठी सोलापूर जिल्ह्यातील नाणज हे संरक्षित अभयारण्य आहे. याठिकाणी माळढोकची अंडी कृत्रिमपणे उबविण्यात येणार असल्याची माहिती भारतीय प्राणी सर्वेक्षण (झेडएसआय) पुण्याचे प्रभारी अधिकारी, शास्त्रज्ञ डॉ. वासुदेव त्रिपाठी यांनी दिली.

माळढोक हा भारतातील व पाकिस्तानातील कोरड्या प्रांतांत आढळणारा अत्यंत दुर्मिळ पक्षी आहे. याला इंग्रजीत ‘ग्रेट इंडियन बस्टार्ड’ म्हणतात. माळढोकची उंची चार फूट तर वजन तीस ते चाळीस किलो असते. याची संख्या राजस्थानमध्ये दोनशे ते अडीचशेच्या दरम्यान आहे. माळढोकची शिकार आणि अधिवासाचा ऱ्हास यामुळे ही प्रजाती अतिशय संकटग्रस्त स्थितीत आहे. हा पक्षी १९७२ च्या वन्यजीव संरक्षण अधिनियम अन्वये संकटग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आला आहे. याचे मुख्य खाद्य लहान व मोठे कीडे, टोळ, बिया, छोटी झुडपे इत्यादी आहेत. माळढोक वर्षातून एकदा एकच अंडे देतो. तेही उघड्यावर (जमिनीवर, झाडांच्या बुंध्याच्या आसपास, नांगरटीमध्ये) असते. त्यामुळे शिकारी पक्षी, भटकी कुत्री, घोरपड हे प्राणी माळढोकची अंडी खातात. महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील अभयारण्यात माळढोक पक्ष्यासाठी संरक्षित अरण्य स्थापन झाले आहे.

“ सोलापूर जिल्ह्यातील नाणज या अभयारण्यात तीन ते पाच माळढोक पक्षी शिल्लक राहिले आहेत. त्यांच्या संवर्धनाचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे माळढोक पक्ष्यांची अंडी कृत्रिमपणे उबविण्याचे प्रयत्न केले जाणार आहेत. यासह भारत सरकार काही ठिकाणी कृत्रिम ब्रीडिंग सेंटर तयार करणार आहे.

**– डॉ. वासुदेव त्रिपाठी,**
शास्त्रज्ञ, प्रभारी अधिकारी,
भारतीय प्राणी सर्वेक्षण ”

देशाच्या स्वातंत्र्यानंतर काही वर्षांनी माळढोक पक्षी पाकिस्तानातून स्थलांतरित होऊन राजस्थान, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्रात येत असत. मात्र पाकिस्तानात मोठ्या प्रमाणात माळढोकची शिकार करण्यात आली. तर काही स्थलांतर करताना मोठ्या वीज वाहिन्यांमध्ये अडकून मृत्यूमुखी पडतात.

### माळढोक पक्ष्यांना रेडिओ कॉलर

महाराष्ट्रात फक्त तीन ते चार माळढोक पक्षी शिल्लक राहिले आहेत. त्यांच्या संवर्धनासाठी प्रयत्न सुरू आहेत. यामध्ये पक्ष्यांना रेडिओ कॉलर लावण्याचा समावेश आहे. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी बरोबर काम करणारे व पर्यावरणतज्ज्ञ डॉ. प्रमोद पाटील हे माळढोक संवर्धनासाठी विशेष प्रयत्न करीत आहेत.

# विनापरवाना पहाटे पाच वाजेपर्यंत सुरू असलेल्या पबवर राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई



पुणे - प्रतिनिधी
महा मेट्रो

विमाननगर परिसरात विनापरवाना पहाटे ५ वाजेपर्यंत सुरू असलेल्या द नॉयर (रेड जंगल) या पबवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने धडक कारवाई केली. पबमधून १७८ विदेशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या, तर ५० आरोपींना ताब्यात घेतल्याची माहिती एक्साईज विभागाच्यावतीने देण्यात आली.

परवाना नसताना हॉटेल द नॉयर या पबचा चालक अमरजित सिंग संधू (३०) आणि धर्मेश राज स्वामी (३१, रा. बडोदिया हाऊस, गणेशनगर, वडगाव वेशी) यांनी दारू पिण्यासाठी जागा उपलब्ध करून दिल्याने त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या ठिकाणी मद्य प्राशन करणारे एकूण ४२ तरुण-तरुणींना ताब्यात घेण्यात आले होते. या कारवाईदरम्यान एक्साईज विभागाने पबमधील मद्य व्यवसाय चालू ठेवण्यासाठी वापरलेले इतर साहित्य खुर्ची, सोफा, लाकडी टी पॉय, लोखंडी स्पिकर, साऊंड लॅपटॉप, एक कॉम्प्युटर, काचेचे ग्लास, फॉग मशीन आदी साहित्य जप्त केले. एकूण ५२ आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे.

त्यापैकी दोन आरोपी पब चालक व व्यवस्थापक यांचा शोध सुरू आहे. पबमधून ३ लाख ६७ हजार ३८० रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. यातील दोन आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना १० जानेवारी २०२६ पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. याप्रकरणी विमानतळ पोलिस ठाण्यात अवैधरीत्या हुक्का बार चालवून ग्राहकांना तंबाखूजन्य फ्लेवर असलेला हुक्का सेवन करण्यासाठी पुरवत असताना मिळवून आल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# घरफोडी करणारी टोळी जेरबंद, २९ लाखांचा मुद्देमाल पोलिसांकडून जप्त

चिंचवड - प्रतिनिधी
महा मेट्रो

शहरात जबरी चोरी व घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीला गुन्हे शाखा युनिट दोनच्या पथकाने अटक केली आहे. आरोपींकडून २४ तोळे सोन्याचे दागिने, अडीच किलो चांदीसह तब्बल २९ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चोरीचे दागिने विकत घेणाऱ्या सराफ व मध्यस्थांनाही या गुन्ह्यात आरोपी करण्यात आले आहे. या कारवाईसाठी पोलिसांनी तब्बल २०० ते २५० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. आरोपी कोणत्या मार्गाने जातात याचा सखोल अभ्यास करून पोलिसांनी सापळा रचत त्यांना जेरबंद केले.




अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे सनीसिंग पापसिंग दुधानी, जलसिंग राजपुतसिंग दुधानी आणि मनीष बाबूलाल कुशवाह अशी आहेत. तसेच चोरीचे दागिने विकत घेणारे किरपाणसिंग शितलसिंग दुधानी, शांताराम उर्फ संतोष गुरप्पा कांबळे आणि अक्षय राजू चनाल यांनाही अटक करण्यात आली आहे.

आरोपी बंद घरांचे कुलूप व कोयंडा तोडून घरफोडी करत होते. हिंजवडी परिसरातून चारचाकी वाहन चोरून त्याच वाहनातून रावेत परिसरात घरफोडी करत सोने-चांदीचे दागिने लंपास करण्यात आले. घटनेनंतर आरोपी फरार झाले होते. या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखा युनिट दोनकडून सुरू असताना, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपी जुन्या पुणे-मुंबई महामार्गाने लोणावळ्याच्या दिशेने जात असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी १२ जणांचे विशेष पथक तयार केले.

पोलीस उपायुक्त शिवाजी पवार आणि सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांच्या टीम ने सोमटने फाटा टोलनाक्यावर सापळा रचण्यात आला. घरफोडीनंतर चोरीच्या वाहनातून येत असताना पोलिसांनी वाहन अडवून आरोपींना ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींकडून तब्बल १२ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले असून, अडीच किलो चांदी, २४ तोळे सोन्याचे दागिने तसेच दुचाकी व चारचाकी वाहने असा एकूण २९ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# अन्यायाविरोधात निवडणूक लढवण्याची तयारी; मला उमेदवारी द्यावी; संजीवनी कोमकरांची अजित पवारांकडे मागणी

पुणे - प्रतिनिधी
महा मेट्रो

शहरातील कुख्यात आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू आंदेकर याने आगामी महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. पुण्यातील भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयात हा अर्ज दाखल करण्यात आला. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यापूर्वी सोनाली वनराज आंदेकर आणि लक्ष्मी उदयकांत आंदेकर यांनीही आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

अर्ज दाखल करण्यासाठी पोलीस बंदोबस्तात आलेल्या बंडू आंदेकरने यावेळी जोरदार घोषणाबाजी केली. नेकी का काम आंदेकर का नाम, बघा बघा मला लोकशाहीत कसं आणलंय, आंदेकरांना मत म्हणजे विकासकामाला मत अशा घोषणा त्याने दिल्या. बंडू आंदेकर मोठमोठ्या आवाजात घोषणाबाजी करीत महापालिका निवडणुकीसाठी भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयात अपक्ष उमेदवार अर्ज दाखल करायला गेला खरा; मात्र अर्ज अर्धवट असल्यामुळे तो भरूनच घेतला नाही अशीही माहिती समोर येत आहे.



दरम्यान, या घडामोडींवर आज आयुष कोमकरच्या आई संजीवनी कोमकर यांनी माध्यमांशी बोलताना तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. आंदेकर कुटुंबियांना कोणत्याही राजकीय पक्षाने उमेदवारी देऊ नये, अशी कळकळीची विनंती त्यांनी केली. त्या म्हणाल्या की, पोलिसांनी आणि न्यायालयाने आंदेकरला अर्ज भरण्याची परवानगी दिली असली तरी अर्ज भरण्यापूर्वी करण्यात आलेली घोषणाबाजी चुकीची होती. या प्रकरणी आपण न्यायालयात जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या आंदेकर आरोपींनी अनेक लोकांची घरे उध्वस्त केली आहेत. त्यांनी समाजासाठी काय काम केले आहे? माझे लोकांना आवाहन आहे की त्यांनी आंदेकरांना मतदान करू नये, त्यांना निवडून देऊ नये आणि कोणत्याही पक्षाने त्यांना उमेदवारी देऊ नये असे आवाहन संजीवनी कोमकर यांनी केले. त्या पुढे म्हणाल्या की, अन्यायाविरोधात लढण्यासाठी मी स्वतः निवडणूक लढवण्यास तयार असून त्यासाठी उमेदवारी देण्यात यावी. उपमुख्यमंत्री अजित पवार यांना उद्देशून त्या म्हणाल्या, अजित पवार कोयता गँग थांबवा असे म्हणतात, मग आंदेकरांना तिकीट देऊ नये. आंदेकरांना कोण मदत करत आहे याची माहिती नसली तरी राजकीय लोक त्यांना मदत करत असल्याचा आरोप त्यांनी केला. जर कोणत्याही पक्षाने आंदेकरांना तिकीट दिले, तर त्या पक्षाच्या कार्यालयाबाहेर आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

निवडणूक लढवण्याबाबत अद्याप अंतिम निर्णय घेतलेला नसल्याचे सांगत त्यांनी अपक्ष निवडणूक लढवणार नसल्याचे स्पष्ट केले. अजित पवार यांची भेट घेण्यासाठी प्रयत्न केले असल्याचेही त्यांनी नमूद केले. संजीवनी कोमकर यांनी पुढे स्पष्ट केले की, वनराज आंदेकर हा त्यांचा भाऊ असला तरी वनराज आंदेकर हत्या प्रकरणाशी त्यांचा किंवा त्यांच्या कुटुंबाचा कोणताही संबंध नाही. मी माझ्या भावाची सुपारी का देईन? आम्ही काहीही चुकीचे केलेले नाही, तरीही आम्हाला भोगावे लागत आहे, असे त्या म्हणाल्या. त्यांनी आंदेकर कुटुंबावर गंभीर आरोप करत विजय निंबाळकर, निखिल आखाडे, आयुष कोमकर आणि गणेश काळे यांच्या हत्यांचा उल्लेख केला. या संपूर्ण प्रकरणामुळे पुण्यातील राजकीय वातावरण तापले असून, आंदेकर कुटुंबाच्या उमेदवारीवरून पुढील काळात वाद अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# अजित पवार एकाकी, तिरंगी लढतींची शहरात शक्यता; नवे उमेदवार शोधण्याची राष्ट्रवादीवर वेळ

पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकाकी पडला आहे. त्यामुळे शहरात या निवडणुकीत तिरंगी लढती होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. तसेच भाजपने राष्ट्रवादीच्या तगड्या पदाधिकाऱ्यांना गळाला लावल्याने अजित पवार यांना त्यांच्याच बालेकिल्ल्यात नव्याने उमेदवार शोधण्याची वेळ आली आहे.



गेल्या दोन ते तीन दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याची शक्यता वर्तविली जात होती. ती शक्यता शुक्रवारी मावळली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)सोबत जाण्याची चिन्हे होती; त्यामुळे महाविकास आघाडीचे गणित बिघडले होते. मात्र, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कोणते चिन्ह घेऊन लढायचे हा वादाचा मुद्दा ठरल्यानंतर हे दोन्ही पक्ष स्वतंत्रपणे लढणार असल्याचे स्पष्ट झाले. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आता महाविकास आघाडीसोबत जाणार आहे. महायुतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)चा समावेश होणार नसल्याचे यापूर्वीच स्पष्ट झाले होते. काँग्रेसने विरोध केल्याने अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे महाविकास आघाडीत समावेश होण्याची दारे बंद झाली होती. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला आता स्वबळावरच निवडणूक लढवावी लागणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर शहरातील बहुतांश नगरसेवक हे अजित पवार यांच्यासोबत गेले होते. तर काही नगरसेवक हे शरद पवार गटाकडे होते. हडपसरचे आमदार चेतन तुपे हे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)कडून निवडून आले आहेत. मात्र, भाजपने याच मतदारसंघातून राष्ट्रवादीचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते गळाला लावले आहेत. त्यामुळे या मतदारसंघातून जास्त नगरसेवक निवडून आणण्यासाठी त्यांना प्रयत्न करावे लागणार आहेत. तर शरद पवार यांना मानणारा मतदार या मतदारसंघात असल्याने अजित पवार यांच्या पक्षासमोर महाविकास आघाडीच्या उमेदवारांचे आव्हानही असेल.

# महाविकास आघाडीत समान जागा लढविण्याची तयारी? मनसेचा प्रश्न कायम

पुणे - प्रतिनिधी
महा मेट्रो

महापालिका निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचे जागावाटप ठरल्याची शक्यता वर्तविण्यात येत असून उद्धवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार गट या तीन प्रमुख पक्षांना प्रत्येकी ५० जागा, तर समविचारी मित्रपक्षांना १५ जागा देण्याबाबत एकमत झाल्याचेही बोलले जात आहे. मात्र, याबाबत अंतिम निर्णय झाला नसल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. दरम्यान, मनसे उद्धवसेनेसोबत येण्यास तयार असली आघाडीत तिला स्थान असेल का? याबाबत अनिश्चितता आहे. या १५ जागांपैकी किती जागा मनसेला मिळणार आणि त्याला मनसेची मान्यता देणार का? यावर अनेक समीकरणे अवलंबून असतील.



महापालिका निवडणुकीत भाजपने राष्ट्रवादी अजित पवार गटाला दूर ठेवल्यानंतर दोन्ही राष्ट्रवादीच्या गटांची संभाव्य युती होईल अशी जोरदार चर्चा सुरू झाली होती. मात्र, ती फिसकटली तर सत्तेत सहभागी असलेल्या अजित पवार गटाशी युती नको, अशी स्पष्ट भूमिका काँग्रेसने घेतली. अखेर राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या नेत्यांनी महाविकास आघाडीबरोबर जाण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार शुक्रवारी (दि. २६) झालेल्या बैठकीत जागावाटपाच्या सूत्रावर शिक्कामोर्तब झाल्याचे बोलले जात आहे. याबाबत काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे म्हणाले, ‘महाविकास आघाडी एकत्रितपणे निवडणूक लढविण्यास तयार आहे. पुण्यातील आघाडीत मनसेचा समावेश नाही. समसमान जागावाटप करण्यात येणार असले, तरी एखाद्या प्रभागात ज्या पक्षाचा उमेदवार अधिक सक्षम असेल, त्याला प्राधान्य देण्यात येईल.’

प्रशांत जगताप हे वानवडीमधून महापालिकेत प्रतिनिधित्व करत होते. त्यांनी आता काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर महाविकास आघाडीच्या जागावाटपाच्या चर्चेत राष्ट्रवादी शरद पवार गटाने या प्रभागावर दावा केला आहे. त्यामुळे प्रशांत जगताप यांना काँग्रेसकडून उमेदवारी मिळेल का?, असा प्रश्न देखील उपस्थित केला जात आहे. दरम्यान, या प्रभागात भाजपकडे तगडा चेहरा नसल्यानेच काँग्रेसच्या माजी नगरसेवक अभिजीत शिवरकर यांच्यावर गळ टाकण्यात आला. त्यामुळे भाजप या प्रभागातून शिवरकर यांच्या रूपाने राष्ट्रवादीला टक्कर देण्याच्या तयारीत आहे. हा प्रभाग राष्ट्रवादीने आपल्याकडेच ठेवल्यास प्रशांत जगताप यांना कोणत्या प्रभागातून उमेदवारी दिली जाईल, याकडे देखील लक्ष लागून आहे.

# थोरल्या काका-पुतण्यांसह खासदार सुप्रिया सुळेंची अदानींवर स्तुतीसुमने; तर अदानींकडून शरद पवारांचे कौतुक

बारामती -प्रतिनिधी
महा मेट्रो

आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या देशातील पहिल्या अत्याधुनिक महाविद्यालयाचे उद्घाटन बारामतीत उद्योगपती गौतम अदानी यांच्या हस्ते आज झाले. यावेळी उद्योगपती गौतम अदानींवर ज्येष्ठ नेते शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह खासदार सुप्रिया सुळे यांनी स्तुतीसुमनांचा वर्षाव केला.

बारामती येथे आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, गौतमभाईंनी १९८८ साली शुन्यातून व्यवसायाची सुरुवात केली. आज त्यांच्या उद्योग समुहाचे जगातील २० देशांमध्ये कार्य सुरू आहे. ते तीन लाख लोकांना रोजगार देतात. पुढील पाच वर्षांत हा आकडा ५ लाखांवर जाईल. गुजरातमध्ये नापीक जमिनींवर ३० हजार मेगावॅट वीज निर्मितीचे त्यांचे काम सुरू आहे. ५ हजार कोटींची दोन हॉस्पिटल्सही त्यांची सुरू आहेत. यामध्ये श्रीमंतांबरोबरच गरिबांसाठीही आरक्षित बेड आहेत. अदानींचा ‘सीएसआर’ १,००० कोटींचा आहे आणि दोन वर्षांत तो ३,००० कोटींवर पोहोचेल. एखाद्याच्या एका व्हिजन आणि काम करण्याच्या जिद्देनं काय साध्य होऊ शकतं हे त्यांच्या उद्योग समुहाकडे पाहून कळतं, असे उपमुख्यमंत्री पवार यांनी अदानींचे कौतुक केले.

खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, ३० वर्षांपासून पवार आणि अदानी कुटुंबाचे प्रेमाचे नाते आहे. माझ्यासाठी गौतम अदानी आणि त्यांच्या पत्नीचे मोठ्या भावाचे आणि वहिनीचे नाते आहे. चांगली - वाईट प्रत्येक गोष्ट त्यांना मी हक्काने सांगते. तेदेखील हक्काने रागावतात आणि जीव लावतात. त्यांच्या संघर्षाला आम्ही जवळून पाहिले आहे. या यशात त्यांच्या पत्नीचा मोठा वाटा असल्याचे सुळे यांनी कौतुक केले.

ज्येष्ठ नेते शरद पवार म्हणाले, गौतम अदानी यांचे अनेक क्षेत्रांमध्ये मोठे योगदान आहे. सुरुवातीला गुजरातमधून मुंबईला आल्यावर त्यांच्याकडे काही नव्हते. पण, काही तरी उभे करण्याची जिद्द होती. त्यांनी आज लाखो लोकांना रोजगार दिला आहे. त्यांनी समाजहिताच्या अनेक गोष्टी देशात उभ्या केल्या आहेत. त्यांचे कर्तृत्व नव्या पिढीसाठी सांगणे आवश्यक आहे म्हणून त्यांना आज आमंत्रित केले आहे. उद्याचा भारत कसा असेल, याचा विचार अदानींनी मांडला, त्या विचारांनी पुढे गेल्यास देशातील बेरोजगारी हटविण्यात यश मिळेल, अशी माझी खात्री आहे, असे शरद पवार म्हणाले. यावेळी खासदार सुनेत्रा पवार, राजेंद्र पवार, युगेंद्र पवार, आमदार रोहित पवार, विठ्ठल मणियार, नगराध्यक्ष सचिन सातव उपस्थित होते.

# भाजप-शिंदेसेनेच्या जागा वाटपाचा तिढा कायम; शिंदेसेनेच्या नेत्यांमध्येही मतभेद

पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास केवळ दोन दिवस शिल्लक राहिले असतानाही भाजप व शिंदेसेना यांच्यातील जागा वाटपाचा तिढा सुटण्याचे नाव घेत नाही. त्यातच जागांच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी शिंदेसेनेच्या नेत्यांची शनिवारी बैठक झाली. या बैठकीमध्ये नेत्यांमध्ये मतभेद झाल्याने शहरप्रमुख नाना भानगिरे बैठकीतून बाहेर पडले. या पार्श्वभूमीवर महापालिका निवडणुकीमध्ये भाजप आणि शिंदेसेनेची युती होणार का? याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे.

महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अवघे दोन दिवस शिल्लक राहिले आहेत. तरीही भाजप - शिंदेसेना, दोन राष्ट्रवादी आणि काँग्रेस, उद्धवसेना, मनसे यांच्या युती आणि आघाडीमध्ये अजूनही ताळमेळ लागताना दिसत नाही.

भाजप आणि शिंदेसेनेच्या जागा वाटपाचा तिढाही कायम आहे. शिंदेसेनेने भाजपकडे २५ जागांची मागणी केली आहे. परंतु, भाजपकडून त्याला प्रतिसाद दिला जात नाही. या पार्श्वभूमीवर शिंदेसेनेच्या नेत्यांची व पदाधिकाऱ्यांची शनिवारी बैठक झाली. या बैठकीला विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार विजय शिवतारे, शहरप्रमुख प्रमोद नाना भानगिरे आदी उपस्थित होते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बैठकीमध्ये जागा मागण्यावरून काहीसे मतभेद झाल्यामुळे भानगिरे बैठकीतून तडकाफडकी बाहेर पडले. त्यानंतर माजी आमदार रवींद्र धंगेकर हे बैठकीसाठी आले.

गोऱ्हे म्हणाल्या, सन्मानजनक युती व्हावी, अशी भूमिका आहे. या प्रक्रियेदरम्यान उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याशी चर्चा झाली. सध्या चर्चेचा अंतिम टप्पा सुरू असून, दोन्ही पक्षांमध्ये संवाद सुरू आहे. बैठकीतून भानगिरे बाहेर पडल्यासंदर्भात विचारल्यानंतर त्या म्हणाल्या, हा प्रकार गैरसमजातून घडला असून, त्याचा योग्य तो खुलासा होईल. त्यांना अचानक एक फोन आला आणि त्यानंतर त्यांना एक निरोप देण्यात आला. त्या फोनवर काय बोलणे झाले, याची मला माहिती नाही आणि त्यांनी माध्यमांना नेमके काय सांगितले, हेही मला ठाऊक नाही. मात्र, भानगिरे यांचा गैरसमज नक्कीच दूर होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.